ijamrsd.com JAMRSD ISSN: 2583-6404
Journal of Advanced Multidisciplinary Research Studies and Development
Peer Reviewed Referred Journal Bi-monthly Open Access

# महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील विविध योजनांचा अभ्यास (कालावधी सन 2020 ते 2025)

**रवींद्र चिंतामण नेटके[1], प्रा. डॉ. मीना नामदेवराव काळे[2], डॉ. विजय एस. तुंटे[3]**
*[1] संशोधक विद्यार्थी, क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव.*
*Email: ravi.c.netke1@gmail.com*
*[2] मार्गदर्शक, सहयोगी प्राध्यापक, राज्यशास्त्र विभागप्रमुख, डी.डी.एस.पी.कॉलेज, एरंडोल, जि. जळगाव.*
*[3] सह-मार्गदर्शक, राज्यशास्त्र विभाग प्रमुख, प्रताप कॉलेज अमळनेर.*

**सारांश:**
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (प्रचलीत नाव एस.टी ) ही महाराष्ट्र राज्यात रस्त्यांवरून प्रवासी वाहतूक करण्यासाठी स्थापन झालेली राज्य सरकारची कंपनी आहे. तीच्या सेवा आणि वाहने एसटी या लघुरूपानेच महाराष्ट्रीय जनतेत प्रचलीत आहेत. महाराष्ट्र राज्य मार्ग परविहन महामंडळ म्हणजेच MSRTC ही संस्था एसटीचा कारभार चालवते. ही एक स्वतंत्र संस्था आहे जीला सरकार काही प्रमाणात अनुदान देतं आणि इतर पैसा ती स्वतः प्रवाशाच्या माध्यमातून व विविध योजनेतून उभी करते. व एसटीची सेवा "गाव तेथे एसटी रस्ता तिथे एसटी" या ब्रीदवाक्यानुसार खेड्यापासून ते शहरापर्यंत विस्तारलेली आहे. सार्वजनिक प्रवासी वाहतुकीची सुरुवात महाराष्ट्रात १९३२ च्या सुमारास वाहनांद्वारे खासगी व्यावसायिकाद्वारे सुरू झाली. त्यापुढच्या आठ दहा वर्षात या वाहतुकीचे नियम करण्याची गरज भासू लागली. १९४७ मध्ये भारताच्या ब्रिटिशांची राजवट संपुष्टात आली. स्वतंत्र भारताच्या मुंबई प्रांतात १९४८ मध्ये बॉंबे स्टेट रोड ट्रान्सपोर्ट कॉर्पोरेशन (बीएसआरटीसी) या नावाने प्रवासी वाहतूक करण्यासाठी सरकारी कंपनी स्थापन करण्यात येऊन प्रवाशांच्या सार्वजनकि वाहतुकीचा (पब्लीक ट्रान्सपोर्ट) एकाधिकार या कंपनीला बहाल करण्यात आला.
**मुख्य शब्द:** एसटी कर्मचारी, योजना, महिला सन्मान योजना.

► *Corresponding Author: रवींद्र चिंतामण नेटके*

**प्रस्तावना:**
सन 1948 यावर्षी राज्य परिवहन महामंडळाची पहिली गाडी अर्थात पहिली लाल परी धावली तिचा मार्ग पुणे ते अहमदनगर असा होता.
महाराष्ट्र राज्यातील सर्वसामान्य लोकांना खेड्यापासून ते शहरापर्यंत जोडणारी एसटीची सेवा ही एक सामाजिक बांधिलकी निर्माण करणारे सेवा आहे. अनेक पाडे आणि खेड्यापासून शाळेत जाण्यासाठी विद्यार्थी वर्गासाठी हक्काचे वाहन म्हणजे आपली एसटी होय. आजारी व्यक्तींना खेड्यापासून तालुका आणि जिल्हा रुग्णालयात जाण्यासाठी हक्काचे आणि सुरक्षित प्रवासाचे वाहन म्हणजे आपली एसटी होय.
गेल्या काळात महाराष्ट्रात गाजत आहे तो महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (MSRTC) अर्थात एसटी कर्मचाऱ्यांचा संप देशातल्या सर्वात मोठ्या परिवहन महामंडळांपैकी एक असलेल्या महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या कर्मचाऱ्यांनी गेल्या जवळपास आठवड्यापेक्षा जास्त काळापासून संप पुकारला आहे. एसटी च्या कर्मचाऱ्यांनी २८ ऑक्टोबर २०२१ रोजी सुरू केलेला संप महामंडळाचे राज्य सरकारात विलीनीकरण आणि पगारवाढ या प्रमुख कारणांसाठी संप सुरू केला गेला होता.
एसटी महामंडळाचा ताबा जरी राज्य सरकारकडे असला तरी एसटी हे स्वतंत्र महामंडळ आहे. या महामंडळाचे नियम हे राज्य सरकारपेक्षा वेगळे आहेत.

एसटी महामंडळाचे नागरी सेवा नियम आणि कायदे हे वेगळे आहेत. जवळपास ८८ हजार कर्मचारी या नियमाअंतर्गत काम करतात. १६००० एसटीच्या बसेस राज्यभर चालतात. ६५ लाखांपर्यन्त प्रवासी रोज प्रवास करतात. यातुन मिळणा-या नफयामधुन एसटी कर्मचा-यांचे पगार आणि इतर खर्च केला जातो.
पण कोरोनाच्या काळात एसटीचा तोटा हा दहा हजार कोटींच्या घरात असल्याबाबतची माहिती एसटीच्या प्रशासकीय अधिकारी यांनी सांगीतले.

**या योजनेचे अध्ययन करणे का गरजेचे आहे.**
कोरोना काळात एसटी महामंडळ हे डबघाईस गेल्याने, त्यानंतर राबविलेल्या विविध योजनांचा एसटीला कितपत जीवनदान मिळाले हे या राबवलेल्या योजनेतून अभ्यासाच्या दृष्टीने बघता येईल.

**गृहीतके:**
१. कोरोना महामारी काळात एसटी महामंडळ आर्थिक संकटात होती.
२. कोरोना महामारी नंतर एसटी महामंडळाने/ राज्य शासनाने राबविलेल्या विविध योजना अमलात आणल्याने महामंडळास हिताचे ठरले.
३. महिला सन्मान योजनेमुळे एसटी महामंडळाची आर्थिक भरभराट झाली आहे.
४. एस टी महामंडळाने राज्य शासनाने राबविलेल्या विविध योजनेमुळे एसटी महामंडळाकडे प्रवाशांचा वाढता कल.

**संशोधनाची उद्दिष्टे:**
१. कोरोना महामारी काळात एसटी महामंडळातील आर्थिक संकटाचे अध्ययन.
२. कोरोना महामारी नंतर एस टी महामंडळाने / राज्य शासनाने राबवलेल्या योजनांचे अध्ययन.
३. महिला सन्मान योजनेमुळे एसटी महामंडळावर झालेल्या परिणामाचा अभ्यास.
४. विविध योजनेमुळे प्रवाशांचा एसटी महामंडळाकडे बघण्याचा दृष्टिकोन अथवा वाढ की घट याबाबत अध्ययन.

**संशोधन पद्धती:**
सादर केलेल्या अभ्यास विषयाच्या अभ्यासासाठी पूरक माहिती गोळा करण्यात आली. ही माहिती प्राथमिक आणि दुय्यम संसाधनांच्या आधारे मिळवण्यात आली. या माहितीचा अभ्यास करण्यासाठी वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक अभ्यास पद्धत अवलंबण्यात आली आहे.

**एसटी महाराष्ट्राची 'लोकवाहिनी':**
एसटीने संपूर्ण महाराष्ट्रात आपले वाहतूक जाळे विस्तारले आहे. ग्रामीण भागातील शेतकरी, शेतमजूर, विद्यार्थी, ग्रामीण महिला आणि इतर सर्वसामान्यांना त्यांच्या इच्छित स्थळी सुरक्षितपणे पोहोचवण्याची जबाबदारी गेल्या अनेक वर्षांपासून एसटी पार पाडत आहे. शहरी भागात देखील दररोज लाखो प्रवाशांची ने-आण करणारी एसटी बस ही महाराष्ट्राची 'लोकवाहिनी' म्हणून ओळखली जाते. या नव्या योजनेमुळे प्रवाशांचा एसटीवरील विश्वास आणखी वाढण्यास मदत होणार आहे.
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने (MSRTC) २०२० ते २०२५ या काळात प्रवाशांसाठी अनेक नवीन योजना आणि सेवा सुरू केल्या आहेत. यामध्ये प्रामुख्याने 'ई-शिवशाही' इलेक्ट्रिक बसेस, महिलांना ५०% तिकीट सवलत (महिला सन्मान योजना), ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवास, तसेच डिजिटल तिकिटिंग व माल वाहतुकीचा समावेश आहे. या योजनांमुळे प्रवाशांना सुरक्षित व स्वस्त प्रवास उपलब्ध झाला आहे.

**MSRTC च्या प्रमुख योजना (२०२० - २०२५):**
- **महिला सन्मान योजना (५०% सवलत) :**

महाराष्ट्रातील महिलांना एसटीच्या सर्व प्रकारच्या बसेसमध्ये (साध्या, निम-आराम, शिवशाही) ५० टक्के तिकीट दरात सवलत लागू करण्यात आली आहे.

महाराष्ट्र शासन आपल्या राज्यातील महिलांच्या आरोग्यासाठी त्यांच्या उन्नतीसाठी तसेच त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सतत प्रयत्नशील असते आणि त्यासाठी राज्य सरकार वेळोवेळी विविध योजनांची सुरुवात करत असते महाराष्ट्र अर्थसंकल्प 2023 मध्ये महिलांसाठी सुरु करण्यात आलेल्या अशाच एका योजनेची सविस्तर माहिती जाणून घेणार आहोत ज्या योजनेचे नाव महिला सन्मान योजना आहे.

महिला सन्मान योजनेअंतर्गत महाराष्ट्र राज्यातील सर्व महिलांना एसटीच्या सर्व प्रकारच्या बसेसच्या तिकीट दरात 50 टक्के सवलत देण्यात आली आहे.

महाराष्ट्र राज्याच्या सन 2023-24 च्या अर्थसंकल्पामध्ये सर्व महिलांना राज्य परिवहन महामंडळाच्या सर्व प्रकारच्या बस प्रवास भाडयामध्ये 50% सवलत घोषित केली आहे. सदर घोषणेच्या अनुषंगाने दि. 17.03.2023 पासुन सर्व महिलांना राज्याच्या हद्दीपर्यंत राज्य परिवहन महामंडळाच्या सर्व प्रकारच्या बस प्रवास भाड्यामध्ये 50% सवलत अनुज्ञेय करण्यात आली आहे. सदर सवलतीची प्रतिपुर्ती शासनाकडुन करण्यात येणार आहे.

**महिला सन्मान योजनेचे उद्दिष्ट व वैशिष्ट्य:**

राज्यातील सर्व महिलांना एसटी मधून प्रवास करण्यासाठी आकर्षित तसेच प्रोत्साहित करण्याच्या उद्देशाने महिला सन्मान योजनेची सुरुवात करण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाद्वारे महिला सन्मान योजनेची सुरुवात करण्यात आली आहे. राज्य परिवहन महामंडळाच्या सर्व प्रकारच्या बसमध्ये तिकीट दरामध्ये 50 टक्के सवलत लागू करण्यात आली आहे.

महिला सन्मान योजनेची महत्वाची बाब अशी आहे कि, या योजनेचा लाभ राज्यातील सर्व जाती धर्मातील महिला घेऊ शकतात. त्यासाठी त्यांना कुठल्याच प्रकारची प्रवर्गाची अट ठेवण्यात आलेली नाही. ज्या नवीन गाड्या उपलब्ध होतील त्यामध्ये देखील ही सवलत मिळणार आहे.

सर्व महिलांना सर्व प्रकारच्या बसेसमध्ये 50% सवलत अनुज्ञेय करणे बाबत निर्देश प्राप्त झाले. त्यानुसार पुढील प्रमाणे सुचना देण्यात आलेली आहे.

- सर्व महिलांना राज्य परिवहन महामंडळाच्या सर्व प्रकारच्या [ साधी, मिडी /मिनी, निमआराम, विनावातानुकुलीत शयन आसनी, शिवशाही (आसनी), शिवनेरी, शिवाई (साधी व वातानुकुलीत ) इतर इत्यादी ] बसेसमध्ये 50% सवलत दि. 17-03-2023 पासुन अनुज्ञेय करण्यात येत आहे.
- सदरची सवलत ही भविष्यात राज्य परिवहन महामंडळाच्या ताफ्यात नव्याने दाखल होणाऱ्या सर्व प्रकारच्या बसेस करिता देखील लागु राहील.
- सदर योजना ही 'महिला सन्मान योजना' या नावाने संबोधण्यात येत आहे.
- सदरची सवलत सर्व महिलांना महाराष्ट्र राज्याच्या हद्दी पर्यंत अनुज्ञेय आहे.
- सदर सवलत शहरी वाहतूकीस अनुज्ञेय नाही.
- योजनेच्या परिपत्रकीय सुचनेनुसार 100% सवलत अनुज्ञेय राहिल.
- 65 ते 75 या वयोगटातील महिलांना 'महिला सन्मान योजना' हीच सवलत अनुज्ञेय राहिल.
- 5 ते 12 या वयोगटातील मुलींना यापुर्वी प्रमाणेच 50% सवलत अनुज्ञेय राहिल.
- फक्त 75 वर्षावरील महिलांनाच तिकीट दरात 100 टक्के सवलत देण्यात येईल.

- **अमृत ज्येष्ठ नागरिक योजना:**

७५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना एसटी बसेसमधून मोफत प्रवास, तर ६५ ते ७५ वयोगटातील नागरिकांना ५०% सवलत दिली जाते.

- **ई-बसेस (शिवाई व ई-शिवशाही):**

पर्यावरणपूरक प्रवासासाठी महामंडळाने इलेक्ट्रिक बस (ई-बस) सेवेत वाढ केली आहे

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची (MSRTC) ई-बस सेवा (ई-शिवनेरी व शिवाई) ही राज्यातील पर्यावरणपूरक, आरामदायी आणि वातानुकूलित प्रवासासाठी सुरू करण्यात आली आहे. 'ई-शिवनेरी' मुख्यत्वे मुंबई-पुणे दरम्यान, तर 'ई-शिवाई' इंटरसिटी मार्गांवर धावते. या बसेसमध्ये ४३ प्रवाशांची क्षमता, USB चार्जर, सीसीटीव्ही आणि पुश-बॅक सीट्स आहेत, ज्या एका चार्जवर सुमारे २५० किमी अंतर कापू शकतात .

**ई-बस (शिवाई/ई-शिवनेरी) सेवेची प्रमुख वैशिष्ट्ये:**

- **ई-शिवनेरी (AC):** प्रामुख्याने मुंबई-पुणे मार्गावर कार्यरत. ही बस पूर्णपणे वातानुकूलित असून आरामदायक प्रवासासाठी ओळखली जाते.
- **ई-शिवाई (AC/Non-AC):** पुणे, औरंगाबाद, नाशिक, कोल्हापूर, महाबळेश्वर, बीड आणि ठाणे यांसारख्या विविध शहरांना जोडणारी इंटरसिटी सेवा .
- **सुविधा:** आधुनिक पुश-बॅक सीट, मोबाइल चार्जिंग पॉइंट्स, सीसीटीव्ही देखरेख आणि वाय-फाय (काही बसेसमध्ये) .
- **सुरक्षा:** चालकाने मद्यपान केले असल्यास किंवा तो झोपी गेल्यास सतर्क करणारे उपकरण शिवाई बसेसमध्ये असते.
- **भाडे आणि पास:** ई-बस प्रवासाला चालना देण्यासाठी नियमित प्रवाशांसाठी मासिक व त्रैमासिक पास योजना सुरू करण्यात आली आहे .

या पर्यावरणपूरक बसेसमुळे प्रदूषणमुक्त प्रवासासह, खाजगी वाहनांना एक सुरक्षित आणि आरामदायी पर्याय उपलब्ध झाला आहे.

- **माल वाहतूक सेवा (Cargo Service):** एसटी महामंडळाने २०२१ पासून स्वतःची माल वाहतूक सेवा सुरू केली आहे, ज्याद्वारे अवजड मालाची वाहतूक केली जाते .
- **'आवडेल तेथे कोठेही' (Anytwhere Travel Pass):** या योजनेअंतर्गत प्रवाशांना ठराविक दरात अमर्यादित प्रवासाची सुविधा मिळते.

**बसेसचे प्रकार व दर (२०२५ नुसार):**

- **शिवशाही (AC):** १४.२० ₹ प्रति टप्पा .
- **९ मीटर ई-बस:** १३.८० ₹ प्रति टप्पा .
- **शिवाई (Electric AC):** १५.१५ ₹ प्रति टप्पा .
- **साधी/निम-आराम:** १३.६५ ₹ प्रति टप्पा (अंदाजे) .

**विशेष सुविधा:**

- **ऑनलाइन बुकिंग:** MSRTC च्या अधिकृत संकेतस्थळावरून आणि मोबाईल ॲपवरून तिकीट बुकिंगची सुविधा.
- **सुरक्षा व सुविधा:** नवीन बसेसमध्ये महिलांच्या सुरक्षेसाठी पॅनिक बटन आणि सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत.
- हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ, सुंदर बसस्थानक अभियान :-

चालु वर्षात दि. २३ जानेवारी २०२५ ते ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीमध्ये हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ, सुंदर बसस्थानक अभियान राबविण्यात येत आहे. महामंडळाकडे प्रवाशांना आकर्षित करण्यासाठी, प्रवाशांना सुरक्षित प्रवासासोबतच, स्वच्छ बसेस, स्वच्छ प्रसाधनगृहे व सुंदर, टापटीप बसस्थानके देणे आवश्यक आहे, वर्षभर चालणाऱ्या या अभियानातंर्गत बसस्थानकांचा दर्जा वाढविण्यावर भर देण्यात येत आहे. बसस्थानकांचे "अ", "ब" व "क" असे वर्गिकरण करुन राज्यस्तरावर बसस्थानकांचे मुल्यांकन होऊन प्रत्येक गटात प्रथम येणा-या बसस्थानकांस अनुक्रमे रु. १. कोटी, रु.५० लाख व रु. २५ लाख असे पारितोषिके देण्यात येतील. प्रवाशांना बसस्थानक आपले वाटावे आणि जास्तीत जास्त प्रवाशांनी एसटीनेच प्रवास करावा यासाठी या अभियानातंर्गत प्रादेशिक व राज्य स्तरावरील स्वच्छ सुंदर बसस्थानक विजेत्या पुरस्कारांची एकूण रक्कम रु. ३ कोटी ४४ लाख ५० हजारांची बक्षिसे ठेवण्यात आली आहेत.
महामंडळाचे बसस्थानके व परिसराची स्वच्छता अधिक गुणवत्तापुर्वक करण्यासाठी बसस्थानकावर फिरते शौचालय कार्यान्वित करण्याचे नियोजन आहे. तसेच ऑईल कंपन्यांकडून CSR फंडामधुन निधी उपलब्ध करुन बसस्थानक स्वच्छतेसाठी त्याचा वापर करण्यात येईल.

- विद्यार्थी सवलतीमुळे राज्याचा मानव विकास निर्देशांक वाढविण्यास मदतः-

रा.प. महामंडळाकडून राज्याच्या २२ जिल्ह्यातील १२५ तालुक्यांमधील ८ वी ते १२वी पर्यंतच्या विद्यार्थीनीना गाव ते शाळा दरम्यान मोफत प्रवास सवलत खास ८७२ बसेस मार्फत सन २०१२ पासून पुरवली जाते. शिवाय, माध्यमिक,

उच्च माध्यमिक शाळेतील विद्यार्थी, तंत्रशिक्षण व इतर महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना मासिक प्रवासभाड्यात ६६.६७ टक्के सवलत देण्यात येते. दररोज राज्यातील ४.७५ लाख विद्यार्थी महामंडळाच्या सवलतींचा लाभ घेतात. तसेच, अंध, अपंग, दलितमीत्र, आदिवासी सेवक अशा समाजाच्या विविध घटकांचे हित सवलतींच्या माध्यमातुन महामंडळाने जपले आहे. महाराष्ट्र राज्याचा मानव विकास निर्देशांक वाढविण्यात या सर्व सवलतीचा म्हणजेच रा.प. महामंडळाचा सिंहाचा वाटा आहे.

- सावित्रीबाई ज्योतीबा फुले शिष्यवृत्ती योजना :

रा.प. महामंडळातील वर्ग ३ व वर्ग ४ कर्मचाऱ्यांच्या दोन पाल्यांना महाविद्यालयीन शिक्षणास मदत व्हावी म्हणून सावित्रीबाई ज्योतीबा फुले शिष्यवृत्ती योजना दि.०५.१०.२०१८ पासून सुरु करण्यात आलेली आहे. इयत्ता १२ वी नंतर मान्यता प्राप्त विद्यापीठाशी संलग्न असणाऱ्या कोणत्याही पदविका व पदवी अभ्यासक्रमासाठी ही योजना लागु आहे. कर्मचाऱ्याच्या पाल्यांच्या बँक खात्यात शिष्यवृत्ती म्हणून दरमहा रु.७५०/- जमा करण्यात येतात. सदर बाबत सूचना पत्र क्र. राप/९१/मुकाअ/१६३९ दि. ०५.१०.२०१८ अन्वये निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. अहवाल वर्षात ७२८ कर्मचाऱ्यांनी या योजनेचा लाभ घेतला असून रु. ५१.२८ लाख अदा करण्यात आले आहे.

- रा.प.अधिकारी व कर्मचा-यांसाठी परदेशी शिक्षण अग्रीम योजना -

रा.प. महामंडळातील अधिकारी व कर्मचारी यांच्या पाल्यांना परदेशातील विद्यापीठात उच्च शिक्षण घेण्याकरिता प्रोत्साहन मिळावे, या डेशाने रा.प.अधिकारी, कर्मचा-यांना परिपत्रक क्र.राप/मुकाअ/१३६, दि. ०१.०२.२०२४ अन्वये सुचना प्रसारित केल्या आहेत.

- रा.प.अधिकारी व कर्मचा-यांसाठी धर्मवीर आनंद दिघे आरोग्य तपासणी योजना -

रा.प. महामंडळातील अधिकारी व कर्मचारी ज्यांचे वय ४० वर्षे व त्यापेक्षा अधिक आहे त्यांना दर दोन वर्षातून एकदा आरोग्य तपासणी करणे बंधनकारक आहे. या तपासणीमध्ये ११ चाचण्यांचा समावेश आहे. या तपासणीची अधिकतम रु. ३०००/- मर्यादेपर्यंत प्रतिपुर्ती करण्यात येईल अशा परिपत्रक क्र.राप/मुकाअ/१३७, दि.०१.०२.२०२४ अन्वये सूचना प्रसारित केल्या आहेत. दर दोन आर्थिक वर्षांतून एकदा ११ प्रकारच्या मोफत आरोग्य तपासण्या (उदा. CBCथायरॉईडकोलेस्ट्रॉल, ECG) बंधनकारक व मोफत करून देणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. ज्याचा खर्च महामंडळ उचलते.

**माहितीचे विश्लेषण:**

एसटी महामंडळातील कार्यरत असलेल्या कर्मचा-यांच्या अडीअडचणी समस्या व न्याय हक्क आणि कर्मचा-यांच्या सेवा सुरक्षा मिळवून देण्यासाठी व प्रवासी उत्पन्नात वाढ होण्यासंदर्भात महामंडळात विविध श्रमिक संघटना अस्तित्वात आहे.

एस टी महामंडळाची आर्थिक दृष्ट्या भरभराट व्हावी या दृष्टिकोनातून एसटी महामंडळ / राज्य सरकार राज्यातील जनतेसाठी उपयुक्त अशा विविध योजना अमलात आणून एसटी महामंडळ / राज्य सरकार एसटी महामंडळास आर्थिक संकटातून बाहेर आणण्याचा प्रयत्न करत आहे.

एसटी ही राज्याची जीवनवाहिनी मानली जाते, पण सध्या ही जीवनवाहिनी आर्थिक आणि राजकीय विळख्यात अडकली आहे. 'प्रवाशांच्या सेवेसाठी' हे ब्रीदवाक्य घेऊन चालणारे एसटी महामंडळ आता सत्ताधाऱ्यांसाठी 'दुभती गाय' बनले असून, यामागे अनेक राजकीय डावपेच आणि हितसंबंध गुंतलेले आहेत.

सत्ताधारी आणि विरोधी राजकीय नेत्यांचे साटेलोटे सध्याच्या स्थितीत संप करण्याची वेळ कामगारांवर का आली याची माहिती घेताना विदारक सत्य समोर येते. मात्र विलीनीकणाची मागणी देखील अतिशयोक्ती असून त्यात सत्ताधारी आणि विरोधीपक्षांतल्या राजकीय नेत्यांचे साटेलोटे असल्याचा आरोप या सूत्रांनी केला. वेतन आणि भत्ते: वेळेवर पगार न मिळणे, थकीत भत्ते यामुळे कर्मचारी असंतुष्ट आहेत.

एसटीच्या आर्थिक कारभारावर सरकारचे नियंत्रण आहे. महानियंत्रक लेखापरिक्षक (एजी) कडून आर्थिक व्यवहाराचे ऑडिट केले जाते. एसटी महामंडळाकडून सेंट्रल गव्हर्नमेंट, स्टेट गव्हर्नमेंट व स्थानिक स्वराज्य संस्था यांना २७% कर भरणा होतो. प्रवासी जनतेला म्हणजेच शालेय विद्यार्थ्यांना एक तृतीयांश भाडे घेऊन पास दिले जातात. अंध, अपंग, पत्रकार ,दुर्धर आजाराने पीडित असलेले प्रवासी यांना तिकीट दरात सवलत दिली जाते त्या अंतर्गत राज्य सरकार अनुदान देते. दरवर्षी ताळेबंद तयार करून तो शासनाला सादर केला जातो.

**योजना चे फायदे व तोटे : महिला सन्मान योजना :**

**योजनेचे फायदे:**

- ५०% तिकीट सवलत: राज्यातील सर्व महिलांना एसटीच्या साध्या,निम-आराम,शिवशाही आणि शिवनेरी अशा सर्व बसेसच्या तिकीट दरात ५० टक्के सवलत मिळते.
- प्रवासात बचत: महिला प्रवाशांचा प्रवासाचा खर्च निम्मा झाला आहे.
- सुरक्षित प्रवास: सरकारी बस असल्याने महिलांना अधिक सुरक्षित व विश्वासार्ह प्रवास मिळतो.
- एसटी महामंडळाला फायदा: या योजनेमुळे महिला प्रवासी संख्या वाढली आहे आणि एसटीच्या तिजोरीत भर पडत आहे.

**योजनेचे तोटे:**

- गर्दीत वाढ: सवलतीमुळे बसेसमध्ये प्रचंड गर्दी वाढली आहे. ज्यामुळे बऱ्याचदा जागा मिळत नाही.
- सुविधांचा अभाव: वाढत्या गर्दीमुळे एसटीच्या सोयीसुविधा स्वच्छतेवर ताण पडत आहे.
- तिकीट काढताना वेळ: गर्दीच्या वेळी तिकीट काढण्यासाठी लांबच लांब रांगा लागतात.
- बसेसची अपुरी संख्या: प्रवाशांची संख्या वाढल्यामुळे सध्याच्या बसेसची संख्या अपुरी आहे.
- ही योजना महिलांना आर्थिक दिलासा देणारी आणि सक्षमीकरण करणारी ठरली आहे.

**अमृत ज्येष्ठ नागरिक योजना**

**योजनेचे फायदे:**

- मोफत प्रवास: ७५ वर्षांवरील नागरिकांना एसटीच्या सर्व सेवांमधून (साधीनिम-आरामशिवशाहीशिवनेरी) मोफत प्रवास.
- कमी खर्च: केवळ ₹५८५ चा स्मार्ट कार्ड (शुल्क व प्रक्रिया शुल्क) भरून वर्षभर मोफत प्रवास.
- सर्व प्रकारच्या बसेस: लालपरीपासून ते वातानुकूलित शिवनेरी बसपर्यंत सर्व प्रकारच्या बसेसचा लाभ.
- सुरक्षितता व सुविधा: ज्येष्ठ नागरिकांसाठी खास सुविधाज्यामुळे प्रवास सुरक्षित व आरामदायी होतो.
- सोपी कागदपत्रे: आधार कार्डपॅन कार्डकिंवा रेशन कार्ड यापैकी कोणताही एक पुरावा दाखवून प्रवास करता येतो.

**योजनेचे तोटे:**

- मर्यादित वयोगट: ही सुविधा केवळ ७५ वर्षांवरील व्यक्तींसाठी आहे (६५-७४ वयोगटासाठी ५०% सवलत आहेपण पूर्ण मोफत नाही).
- स्मार्ट कार्डची गरज: या योजनेसाठी 'स्मार्ट कार्ड' असणे अनिवार्य आहेज्यासाठी अर्ज करावा लागतो.
- वेळेची मर्यादा: मोफत प्रवासाची सवलत राज्य परिवहन महामंडळाच्या (ST) बसेसपुरतीच मर्यादित आहे.
- स्मार्ट कार्ड प्रक्रिया: स्मार्ट कार्ड बनवण्याची प्रक्रिया कधीकधी वेळखाऊ असू शकते.

**सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजनेचे फायदे:**

**योजनेचे फायदे**

- शिक्षण गळती रोखणे: मागासवर्गीय मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात ठेवण्यास मदत होते [१].
- आर्थिक मदत: ५ वी ते ७ वी साठी दरमहा ६० रुपये (१० महिन्यांसाठी ६०० रु.) आणि ८ वी ते १० वी साठी दरमहा १०० रुपये (१० महिन्यांसाठी १००० रु.) मिळतात [५७].
- उत्पन्नाची अट नाही: पालकांच्या उत्पन्नाची कोणतीही अट नसल्याने सर्व गरजू मुलींना लाभ मिळतो [१७].
- महिला सक्षमीकरण: मुलींना स्वावलंबी बनवण्यासाठी आणि शिक्षणाकडे वळवण्यासाठी प्रोत्साहन मिळते.

**योजनेचे तोटे:**

- अल्प रक्कम: सध्याच्या महागाईच्या काळात शिष्यवृत्तीची रक्कम (दरमहा ६०-१०० रुपये) अत्यंत कमी आहे [५].
- मर्यादित वर्ग: ही योजना फक्त इयत्ता ५ वी ते १० वी पर्यंतच मर्यादित आहे [१].
- कागदपत्रांची पूर्तता: MahaDBT वर ऑनलाइन अर्ज करणे आवश्यक असल्यानेग्रामीण भागातील मुलींना तांत्रिक अडचणी येऊ शकतात [७].
- वेळेवर मिळण्यात विलंब: अनेकदा शिष्यवृत्तीची रक्कम खात्यात जमा होण्यास विलंब होतो.

**'धर्मवीर आनंद दिघे आरोग्य तपासणी योजना'**
**योजनेचे फायदे:**
- मोफत आरोग्य तपासणी: ४० वर्षांवरील कर्मचाऱ्यांची ११ प्रकारची व्यापक तपासणी मोफत केली जाते.
- आजारांचे लवकर निदान: चाळिशीनंतर उद्भवणाऱ्या थायरॉईडकिडनीहृदयविकार अशा आजारांचे वेळेवर निदान शक्य होते.
- कर्मचाऱ्यांचे आरोग्य: नियमित तपासणीमुळे कर्मचाऱ्यांचे आरोग्य उत्तम राहण्यास आणि आजार टाळण्यास मदत होते.
- आर्थिक भार कमी: तपासण्यांचा खर्च महामंडळ करत असल्याने कर्मचाऱ्यांची बचत होते.

**योजनेचे तोटे:**
- अंमलबजावणीतील त्रुटी: अनेकदा कर्मचाऱ्यांकडून तक्रारी येतात की रुग्णालयांमध्ये योग्य सेवा मिळत नाही किंवा तपासणी अहवाल मिळण्यास विलंब होतो.
- गैरव्यवहाराचे आरोप: या योजनेमध्ये कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे प्रश्न विधान परिषदेत उपस्थित करण्यात आले होते.
- मर्यादित कव्हरेज: ४० वर्षांखालील कर्मचारी किंवा काही विशिष्ट आजार या योजनेच्या कक्षेत येत नाहीत.
- तात्काळ उपचारांचा अभाव: ही फक्त 'तपासणी' योजना आहे'उपचार' योजना नाही. त्यानंतरच्या उपचारांसाठी वेगळ्या योजनेवर अवलंबून राहावे लागते.
- थोडक्यातही योजना कर्मचाऱ्यांच्या आरोग्यासाठी चांगली असलीतरी त्यातील गैरव्यवहार आणि अंमलबजावणीतील त्रुटी दूर करणे आवश्यक आहे.

**निष्कर्ष:**

" महाराष्ट्राची लोकवाहिनी" हि बिरुदावली अभिमानाने मिरविणा-या आपल्या लाडक्या एसटीने गेली ७७ वर्षे ऊन, वारा, पाऊस याचा कोणताही विचार न करता अखंडपणे महाराष्ट्राच्या सर्वसामान्य जनतेची सेवा केली आहे. या वाटचालीत, एसटीवर अनेक संकटे आलीत, परंतू एसटीचे चाक कधीही थांबले नाही. मात्र, कोरोना महामारीसारख्या, "न भूतो न भविष्यती" अशा संकटाने २०२१-२२ मधील टाळेबंदी परिस्थितीत महामंडळाचे चालन पूर्णपणे विस्कळीत झाले. वाहतूकीवरील निर्बंधामुळे सुरवातीस केवळ ५-६ टक्के चालनावरुन नंतर काही महिन्यात ८५ टक्के पर्यंत वाहतूकीचे चालन वाढवून अहवाल वर्षात एकूण क्षमतेच्या ४० टक्के किलोमिटरचे चालन झाले, परंतू रस्त्यावर प्रवासी संख्या अत्यल्प असल्याने महामंडळाच्या उत्पन्नात प्रचंड प्रमाणात धसरण झाली. सन २०२१-२२ मधील पुर्वाधात महामंडळ हळूहळू पुर्वपदावर येत असतानाच ६ महिने कर्मचारी संपामुळे एसटीची परिस्थिती अधिकच बिकट झाली व महामंडळ आर्थिक संकटात लोटले गेले.

तथापि, या कठीण परिस्थितीस सामोरे जाऊन महामंडळास सक्षम करणे तसेच महामंडळास गतवैभव प्राप्त करुन देण्यासाठी राज्य सरकार कटीबध्द असल्याचे दिसून येते. कारण महामंडळाला उर्जित अवस्था प्राप्त करुन देण्यासाठी बरेच चांगल्या प्रकारे महत्वाचे निर्णय घेतले गेल्याचे दिसते.

आहेत.

१. महामंडळाने राबविलेल्या विविध योजनांमुळे एसटी महामंडळाची भरभराट.
२. महाराष्ट्र शासन हे पहिला सन्मान योजना सुरू करण्याचा घेतलेला निर्णय अत्यंत महत्त्वाचा ठरला.
३. ज्येष्ठ नागरिकांसाठी झालेला 75 वर्षावरील मोफत प्रवासामुळे एसटी प्रवासात ज्येष्ठांची संख्या वाढली.
४. कोरोना काळापासून एसटी आर्थिक दृष्ट्या तोट्यात होती.
५. कोरोना नंतर राबविलेल्या योजनेमुळे एसटी महामंडळास जीवनदान.

**संदर्भ:**

1. कर्मचारी वर्ग खाते परिपत्रक क्र. 10/2020 दि. 30 एप्रिल -2020,
2. शासन निर्णय क्र. DMU-2020/9. क्र९2/आव्यप्र-1 दि.9/5/2020.
3.महामंडळ ठराव क्र. 2025:05:16. दि.7/07/2025
4.परिपत्रक क्र. ०१/२०२५ दि.०६ जुन २०२५.

5. दि. २४ डिसेंबर-२०२५, रोहन देसाई, सहा. जनसंपर्क अधिकारी जनसंपर्क शाखा, यांचे प्रसारित पत्र.
6. परिपत्रक क्र.राप/मुकाअ/१३७, दि.०१.०२.२०२४ .
7.सन 2021 -22 चा महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचा प्रशासन अहवाल.
8. सन 2023 -24 चा महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचा प्रशासन अहवाल.
9. श्री भगुरे ज्ञानेश्वर हरिभाऊ "उत्तर महाराष्ट्रातील महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचा कर्मचारी व्यवस्थापनाचा चिकित्सक अभ्यास" या विषयावर प्रकाशित झालेला शोध निबंध.
10. दिनांक 30 सप्टेंबर 2024 रोजी, मध्यवर्ती कार्यालय मुंबई, येथे दिलेली प्रत्यक्ष भेट.
11. msrtc.maharashtra.gov.in
12. Marathi.webdunia.com
13. shodhaganga.com
14. mr.wikipedia.org
15. Marathi-timesnownews.com.
16. sarkarnama-esakal.com.cdn.ampprojet.org